# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 09 June 2023
# Time 7.10 AM to 7.25 AM
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०९ जून २०२३ सकाळी ७.१० मि.

****

- प्राथमिक कृषी पतसंस्थांना प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राच्या कक्षेत आणण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- रिजर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे;दोन हजाराच्या पन्नास टक्के नोटा बँकांमध्ये जमा
- राज्यातल्या सर्व शासकीय वसतिगृहांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी, उच्चस्तरीय समिती स्थापन
- मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त औरंगाबाद इथं स्मृती स्मारक उभारण्यात येणार
- जालन्यात दोन कृषीसेवा केंद्राचे परवाने रद्द तर ३७ केंद्रांना विक्री बंद ठेवण्याचे आदेश
- मराठवाड्यातल्या मोठ्या अकरा जल प्रकल्पांत सुमारे ३९ टक्के पाणी शिल्लक

आणि

- नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल

****

प्राथमिक कृषी पतसंस्थांना प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राच्या कक्षेत आणण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. नवी दिल्ली इथं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा आणि रसायने आणि खते मंत्री मनसुख मांडविया यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सहकार मंत्रालयानं हा निर्णय घेतला.

देशभरातल्या सुमारे एक लाख प्राथमिक कृषी पतसंस्थांना, सेंद्रिय खतांच्या विपणनाशी जोडण्याचा निर्णयही, यावेळी घेण्यात आला. खत विभागाच्या बाजार

विकास सहाय्य योजनेंतर्गत, खत कंपन्या अंतिम उत्पादनाची विक्री करण्यासाठी, लहान जैव-सेंद्रिय उत्पादकांसाठी एकत्रितरित्या काम करतील. प्राथमिक कृषी पतसंस्था खते आणि कीटकनाशकांच्या फवारणीसाठी ड्रोन उद्योजक म्हणूनही काम करू शकतील. या निर्णयांमुळे प्राथमिक कृषी पतसंस्थांचे उत्पन्न वाढेल, तसंच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढतील असंही मंत्रालयानं सांगितलं आहे.

****

देशात महिलांच्या सुरक्षेसाठी आणखी ३०० वनस्टॉप केंद्र स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी काल नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या वनस्टॉप केंद्रात हिंसेशी संबंधित प्रकरणात महिलांना उपचारात मदत, कायदेशीर सहकार्य, इतर मार्गदर्शन आणि तात्पुरता आसरा देण्याची सोय आहे. यासंदर्भात अधिक माहिती देताना इराणी म्हणाल्या:

***‘‘प्रधानमंत्रीजी ने आदेश दिया की देश के हर जिले मे महिला संरक्षण के लिये वन स्टॉप सेंटर बने। आठ सौ एक सेंटर्स भारत सरकार ने अप्रुव्ह किये। वर्तमान मे सात सौ पैंतीस सेंटर्स देश मे फंक्शनल है। प्रदेशो से मांग आई की जहां जहां जिस जिले की आबादी ज्यादा है या जहां पर महिला के खिलाफ वारदातें ज्यादा है वहां पर वन स्टॉप सेंटर की संख्या बढाई जायें। तो अब तीन सौ और सेंटर्स खोलने का बजट भारत सरकार ने सुनिश्चित कर दिया है।’’***

गेल्या नऊ वर्षात केंद्र सरकारने महिलांसाठी केलेल्या विविध योजनांची माहितीही इराणी यांनी यावेळी दिली. देशात ३४ हून अधिक महिला हेल्पलाईन कार्यरत असल्याचं त्यांनी सांगितलं. अंगणवाड्यांमध्येही अनेक सुधारणा करण्यात आल्या असून, तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचं त्या म्हणाल्या. अंगणवाड्यांमध्ये पोषण ट्रॅकर बसवण्यात आले असून, या माध्यमातून सहा कोटीहून अधिक मुलांची माहिती संकलित झाल्याचं त्यांनी सांगितलं. देशात तीन कोटी ३२ लाख महिलांनी प्रधानमंत्री मातृ वंदन योजनेचा लाभ घेतला असल्याची माहिती इराणी यांनी दिली.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्के कायम ठेवला आहे. बँकेच्या मुंबईत झालेल्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी,

द्वैमासिक आर्थिक पतधोरण जाहीर केलं. व्याज दरात कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याची माहिती, दास यांनी दिली.

दरम्यान, देशभरातून नागरिकांनी दोन हजार रुपयांच्या सुमारे ५० टक्के नोटा जमा केल्या, तसंच अन्य चलनात बदलून घेतल्या असल्याचं, गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं. सुमारे तीन लाख ६२ हजार कोटी रुपये मुल्याच्या दोन हजार रुपयांच्या नोटा वापरात होत्या, त्यापैकी एक लाख ८० हजार कोटी रुपशे मुल्याच्या नोटा जमा करण्यात आल्या, तसंच बदलण्यात आल्या आहेत.

****

अवसायनात गेलेल्या वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेतल्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी प्राधान्यानं द्याव्यात, असे निर्देश, सहकार मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. काल मुंबईत यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. एक लाख ते पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेव रकमांची निश्चिती करुन, त्या तत्काळ परत करण्याचं प्रमाण निश्चित करावं, असंही त्यांनी सांगितलं. सहकार आयुक्त स्तरावर दरमहा बँकेच्या कर्ज वसुली आणि ठेवी परत करण्याबाबत बैठक घेऊन कार्यवाही करावी, आणि याबाबत कृती आराखडा तयार करून एक रकमी परतफेड योजनेला मान्यता देऊन कर्जवसुली करावी, अशा सूचनाही सावे यांनी केल्या आहेत.

****

मुंबईच्या सावित्री देवी फुले शासकिय वसतिगृहात १८ वर्षीय विद्यार्थीनीवर झालेल्या कथित लैगिंक अत्याचार आणि हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितल्या राज्यातल्या सर्व शासकिय वसतिगृहांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी, उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. यासंदर्भातलं परिपत्रक राज्य शासनानं काल जारी केलं. शासकीय वसतीगृहांचा आढावा संबंधित प्राचार्य, वसतीगृह प्रमुख अधिक्षक यांच्याकडून घेऊन, सूचवलेल्या मुद्द्यांवर उपाययोजना करणं, आणि त्यासंदर्भात कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याचं काम ही समिती करेल. या समितीला त्यांचा अहवाल १४ जून पर्यंत शासनाला सादर करायचा आहे.

****

औरंगाबादच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल काल जाहीर झाले. विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. भारती गवळी यांनी ही माहिती दिली. मार्च–

एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या बी.ए, बी.एस्सी, बी.कॉम अभ्यासक्रमांसह, उर्वरित अभ्यासक्रमांचे निकालही काल घोषित करण्यात आले.

****

नाशिक इथून पंढरपूरला जाण्यासाठी आज सायकल वारी निघणार आहे. राज्यातून पाच हजार सायकलपटू या वारीत सहभागी होतील, असं नाशिक जिल्हा सायकल संघटनेनं म्हटलं आहे. हे सायकलपटू आपल्या वारी मार्गात पर्यावरणाच्या दृष्टीनं संदेश देणार असून, पथनाट्य सादर करणार आहेत. पंढरपूर इथं सायकलपटू पंढरपूर नगरीची प्रदक्षिणा करुन रेल्वे मैदानावर रिंगण करतील. याच ठिकाणी त्यांचं संमेलन देखील होणार आहे. सायकल संघटनेच्या महासंघाची यावेळी स्थापना करण्यात येईल, असं संघटनेनं कळवलं आहे.

****

श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा येत्या १८ ते २३ जून या कालावधीत सातारा जिल्ह्यातून पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल जिल्ह्यात लोणंद पालखीतळ आणि फलटण पालखी तळाची पाहणी केली. या कालावधीत जिल्हा प्रशासनानं वारकरी आणि भाविकांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना विखे पाटील यांनी केली.

****

केंद्र सरकारच्या नऊ वर्षपूर्ती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीनं राबवण्यात येत असलेल्या “संवाद से संपर्क” अभियानाअंतर्गत, केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी काल औरंगाबाद इथं, समाजातल्या विविध घटकांशी संवाद साधला. केंद्र सरकारनं गेल्या नऊ वर्षाच्या कालावधीत केलेल्या लोक कल्याणकारी योजनांची, तसंच भारतीय अर्थव्यवस्था, गरीब कल्याण योजनांची माहितीही कराड यांनी यावेळी दिली.

****

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त औरंगाबाद शहरात मध्यवर्ती ठिकाणी भव्य स्मृती स्मारक उभारण्यात येणार असल्याचं, पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी सांगितलं आहे. औरंगाबाद इथं मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंत्रीमंडळ उप समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. अंदाजे शंभर कोटी रूपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या या स्मारकाचं काम दोन वर्षात पूर्ण होईल, असं त्यांनी सांगितलं. यामध्ये सांस्कृतिक सभागृह, प्रदर्शन हॉल, ग्रामीण कला,

मराठवाडा मुक्ती संग्रामातल्या आठवणी, इतिहास, ग्रंथालय यासह सर्वच सुविधा असतील, अशी माहिती त्यांनी दिली.

****

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल नांदेड विमानतळाच्या सोयी सुविधांचा आढावा घेतला. या विमानतळाच्या सोयी-सुविधांबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून सर्व स्तरातून तक्रारी येत आहेत. मोठ्या संख्येने विमान प्रवासी असूनही विमानतळाच्या कुशल व्यवस्थापना अभावी प्रवासी विमान सुविधा बंद पडल्याचं सामंत यावेळी म्हणाले. हे विमानतळ चालवणाऱ्या एजन्सीने यात तात्काळ सुधारणा केल्या नाहीत तर इतर विमानतळाच्या धर्तीवर नांदेड विमानतळ उद्योग विभागातर्फे येत्या तीन महिन्यात सुरु करू, अशी घोषणा सामंत यांनी यावेळी केली.

****

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांना अब्रुनुकसानीच्या दाव्याप्रकरणी पुण्यातल्या शिवाजीनगर न्यायालयानं समन्स बजावलं आहे. याअंतर्गत त्यांना येत्या १३ जुलैला न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शिरसाट यांच्याविरुद्ध शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी स्वरुपाचा दावा दाखल केला होता. अंधारे यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्या प्रकरणाच्या आरोपात शिरसाट यांची पोलीस उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली होती. त्यात त्यांना निर्दोष ठरवण्यात आलं होतं.

****

शिवसेनेच्या औरंगाबाद शाखेचा ३८ वा वर्धापन दिन काल विविध उपक्रमांनी साजरा झाला. पक्षाच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीनं, काल खासदार संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत, औरंगाबाद इथं मेळावा घेण्यात आला. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे यावेळी उपस्थित होते.

****

जालना जिल्हा कृषी विभागानं दोन कृषीसेवा केंद्राचे परवाने रद्द केले असून, ३७ कृषीसेवा केंद्र चालकांना तात्पुरती विक्री बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. कापसाच्या बियाणांच्या विशिष्ट वाणांची चढ्या दरानं होत असलेली विक्री आणि खरेदी-विक्रीच्या नोंदीत तफावत आढळल्यानं ही कारवाई करण्यात आल्याची

माहिती, जिल्हा कृषी अधिकारी गुणवंत कापसे यांनी दिली. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आता जिल्ह्यात कापसाच्या वाणांची विक्री कृषी विभागातल्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी कापसाच्या बियाणांच्या विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये, असं आवाहन जिल्हा कृषी विभागानं केलं आहे.

****

औरंगाबाद शहरातल्या बाजारपेठ, हॉटेल्स, बार रात्री साडे बारा वाजेपर्यंत सुरू ठेऊ द्यावेत, अशी मागणी जिल्हा व्यापारी महासंघ आणि हॉटेल व्यावसायिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी काल पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी भेट घेतली. पर्यटन नगरी असणाऱ्या औरंगाबाद शहरामध्ये पर्यटकांची गैरसोय होऊ नये यासाठी हा बदल करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

****

मराठवाड्यातल्या मोठ्या अकरा जल प्रकल्पांची एकूण पाणी पातळी ३८ पूर्णांक ९६ टक्के इतकी आहे. जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळानं, काल ही माहिती दिली. जायकवाडी धरणात सध्या ३४ पूर्णांक ५६ टक्के पाणीसाठा आहे. निम्न दुधना धरणात २९ पूर्णांक ७६ टक्के, येलदरी ५७ टक्के, माजलगाव २३ पूर्णांक २३ टक्के, मांजरा २४ पूर्णांक ३३ टक्के, पैनगंगा ४७ पूर्णांक १८ टक्के आणि विष्णुपूरी धरणात, ५१ पूर्णांक ४९ टक्के पाणीसाठी शिल्लक असल्याचं महामंडळानं सांगितलं आहे.

****

नैऋत्य मोसमी पावसाचं केरळमध्ये आगमन झालं आहे. भारतीय हवामान खात्यानं काल याबाबत अधिकृत घोषणा केली. केरळच्या बहुतांश भागात काल सकाळपासून पावसाला सुरुवात झाली. मोसमी पावसाला यंदा केरळमध्ये पोहोचण्यास तब्बल सात दिवस उशीर झाला आहे. तळकोकणात १६ जून किंवा त्यानंतरच पाऊस दाखल होईल, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान, अरबी समुद्रात बिपरजॉय चक्रीवादळ काल अजून तीव्र झालं आहे. येत्या तीन दिवसांत ते उत्तरकडे सरकणार आहे. मराठवाड्यासह कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उद्यापासून तीन दिवस वादळी वाऱ्यासह मध्यम ते हलका पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात अनेक भागात काल पूर्वमोसमी पाऊस झाला. कळमनुरी तालुक्यातल्या वरूड, वारंगा फाटा, सुकळीवीर, जवळा पांचाळ, डोंगरकडा या भागात सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. हिंगोली तालुक्यातल्या राहोली परिसरात वीज पडून एक बैल जोडी दगावली.

****

इंग्लंड इथं सुरु असलेल्या क्रिकेट विश्वचषक कसोटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कालच्या दुसऱ्या दिवस अखेर भारताच्या पहिल्या डावात पाच बाद १५१ धावा झाल्या. अजिंक्य रहाणे २९, तर के एस भरत पाच धावांवर खेळत आहे. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ४६९ धावांवर संपुष्टात आला. मोहम्मद सिराजनं चार, शार्दुल ठाकूर आणि मोहम्मद शमीनं प्रत्येकी दोन गडी बाद केले. भारत सध्या ३१८ धावांनी पिछाडीवर आहे.

****

औरंगाबाद शहरात गरवारे स्टेडियम इथल्या सुमारे २७ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रिकेट स्टेडियम उभारण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याचं, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी सांगितलं. आम्हाला खेळू द्या, या संकल्पनेतून लहान मुलांसाठी खुल्या जागा आणि मैदानं, लोकसहभागातून विकसित करण्यात येणार आहे, यासंदर्भात काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. शहरातल्या खुल्या जागा नागरिकांना दत्तक देण्यासाठी महानगरपालिका एक धोरण तयार करणार असल्याचं आयुक्तांनी सांगितलं.

****

उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी काल बालविवाह निर्मुलन जिल्हा कृती दलाची बैठक घेतली. जिल्ह्यातले बालविवाह रोखण्यासाठी पोलीस विभाग, बाल संरक्षण विभाग तसंच शिक्षण विभागाने सजग राहणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्री मातृवंदन योजनेसाठी अल्पवयीन लाभार्थींची नोंद झाल्यास बालविवाह प्रतिबंधक अधिनियमाअंतर्गत गुन्हा नोंद करावा, अशा सूचनाही त्यांनी दिली.

****

परभणी जिल्ह्यात अंमली पदार्थ तसंच अवैध मद्य विक्री करणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याची सूचना पोलिस अधीक्षक रागसुधा आर. यांनी केली आहे. जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी समितीच्या बैठकीत त्या काल बोलत होत्या.

जिल्ह्यात काही ठिकाणी प्रतिबंधित अंमली पदार्थ आणि गुटखा, अवैध मद्यविक्री होत असल्याचं निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे निर्देश दिले.

****